॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र.कबचौउमवि/१४/विवि/युम-३३/ २७ /२०२३ दि. ३१/०१/२०२३

प्रति,

१) मा.प्राचार्य / मा. संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त परिसंस्था

२) मा.संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना..

**विषय :- आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग २०२२ बाबत....**
**संदर्भ :- जा.क्र. कबचौउमवि/१४/युम-३३/ १५ /२०२३, दि.२३/०१/२०२३**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रान्वये विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभागातील नियमित विद्यार्थ्यांसाठी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन विद्यार्थी विकास विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व **धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, ता. यावल, जि. जळगाव** यांच्या संयुक्त विद्यमाने **दि. ९ ते १३ फेब्रुवारी, २०२३** या कालावधी मध्ये स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव या विशेष संकल्पनेवर करण्यात येत असल्याचे कळविण्यात आले आहे.

आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये विविध कला प्रकारात आपले विद्यार्थी जास्तीत-जास्त संख्येने सहभागी होण्याकरीता प्रयत्न करावेत. युवक महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना व कला मंडळाच्या प्रमुखांना या परिपत्रकासोबत दिलेली स्पर्धा नियमावली व माहिती निर्देशनास आणून द्यावी. आपल्या तज्ञ प्राध्यापकांच्या सहकार्याने स्पर्धकांची चांगली तयारी करुन स्पर्धेतील विविध कला प्रकारांमध्ये आपला संघ **सहभागी होणे अनिवार्य आहे.**

युवक महोत्सव नियमावली व माहितीपत्रकासंदर्भात विद्यापीठाच्या वेबसाईटवर भेट द्यावी. विद्यापीठाची वेबसाईट www.nmu.ac.in यावरील Portal Login ला Click करुन युवारंग लिंक दि. २० ते ३१ जानेवारी २०२३ या दरम्यान उपलब्ध असून यात स्पर्धक, साथसंगीतदार आणि संघ व्यवस्थापक यांची माहिती भरणे अनिवार्य आहे. तसेच विविध शुल्क, नोंदणी, प्रवेश, भोजन आदि ई- पेमेंट (NEFT) द्वारे आयोजकांच्या बँक खाती जमा करावेत असे कळविण्यात आले होते.

प्राप्त आदेशान्वये आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग-२०२२ मध्ये सहभागी होणा-या संघाचा विचार करता युवारंग मध्ये सहभागी होण्या-या संघाच्या नोंदणीसाठी विद्यापीठाची वेबसाईट www.nmu.ac.in यावरील Portal Login ला Click करुन युवारंग लिंक करीता **दि. ०५ फेब्रुवारी, २०२३ पावेतो मुदतवाढ** देण्यात येत आहे. कृपया सदर मुदतवाढीची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

(प्रा. सुनील कुलकर्णी)
**संचालक, विद्यार्थी विकास** (अ.का.)

Shivade/Yuvak Mahotsav Faizpur